IO

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** सातारा **P.S.(ठाणे):** वाठार **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0076 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 20/05/2019 14:17 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार

**Time Period (कालावधी):** पहर 5

**Date From (दिनांक पासून):** 20/05/2019

**Date To ( दिनांक पर्यंत):** 20/05/2019

**Time From (वेळेपासून):** 14:17 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 14:17 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 21/05/2019 **Time (वेळ):** 00:05 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद** 002 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 21/05/2019 00:15 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** Oral

5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 0.05 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** वाठार पोलीस ठाणे,कोरेगाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** गणेश शिवाजी शेळके

(b) **Father's Name (वडील का नाव) :** शिवाजी शेळके

(c) **Date/Year of Birth (जन्म** 1988 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**

**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.**(अ. क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कवडेवाडी ,ता कोरेगाव,वाठार ,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कवडेवाडी ,ता कोरेगाव,वाठार ,सातारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.): 91-9096228584

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मोहन गुलाबराव भोसले | | वडील का नाम : गुलाबराव भोसले | 1. वाठार पोलीस स्टेशन,कोरेगाव,वाठार , सातारा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| **S.No.** (अ. क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम सूचना तथ्य ):

खबरी जबाब दिनांक 21/05/2019मी, गणेश शिवाजी शेळके, वय 31 वर्षे, व्यवसाय शेती, रा. कवडेवाडी पोष्ट हिवरे ता. कोरेगांव जि. सातारा मोबाईल नंबर 9096228584.समक्ष हजर होवून देतो खबरी जबाब की, मी वरील ठिकाणी माझे आई-वडील, माझा भाऊ त्याची पत्नी व मुले तसेच माझी पत्नी व मुले असे एकत्रात राहण्यास आहे. तसेच मी शेती करतो.दिनांक 07/04/2019 रोजी आमचे शेजारील बरकडे व आमच्यामध्ये वादावादी झाली होती. त्यामुळे दिनांक 07/04/2019 रोजी मी व दिनांक 08/04/2019 रोजी माझ्या वडीलांनी आमचे शेजारील श्री. बरकडे यांच्याविरूध्द शिवीगाळ व दमदाटी केली म्हणुन वाठार पोलीस स्टेशन येथे जावुन एन सी नंबर अनुक्रमे 216 व 220 प्रमाणे नोंद केली होती. तसेच आमचे शेजारील श्री. विश्वनाथ बरकडे यांनी देखील वाठार पोलीस स्टेशनला जावुन माझ्या व माझ्या भावाच्या विरूध्द एन.सी. नोंदविली आहे. त्यानंतर आमच्या वडीलांनी मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, कोरेगांव उप विभाग कोरेगांव यांच्याकडे आमच्या घराचा पुर्वापार जाण्या येण्याचा रस्ता श्री. बरकडे यांनी बंद केलेबाबतचा तक्रारी अर्ज केला होता. आमचे गांव हे भाडळे ता. कोरेगांव या पोलीस बिटामध्ये येत असल्याने सदरच्या एन.सी. व आमचा तक्रारी अर्ज हा वाठार पोलीस स्टेशनचे भाडळे बिटाचे पोलीस श्री. भोसले यांच्याकडे चौकशीकामी गेला होता. त्यानंतर मला माझ्या वडीलांना व भावाला वाठार पोलीस स्टेशनचे भोसले पोलीस यांनी चौकशीकामी दोन तिन वेळा बोलाविले होते. त्यावेळी भोसले पोलीस यांनी मला बाजुला घेवुन तुझ्या व तुझ्या भावाच्या विरूध्द बरकडे यांनी क्रस एनसी दिली आहे. त्यामध्ये तुम्हाला त्रास होईल, त्यामध्ये मी तुम्हाला मदत करतो त्यासाठी तुम्ही मला 2000 रूपये द्या असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना बरकडे यांनी आमच्यावरच अन्याय केला आहे, आम्हाला शिवीगाळ व दमदाटी केली आहे त्यांच्यावरच कारवाई करा असे सांगितले त्यावेळी भोसले पोलीस यांनी मला काय करायचे ते करतो तु पैसे देणार आहेस का असे विचारले त्यावेळी मी त्यांना आत्ता माझ्याकडे पैसे नाहीत असे सांगितले. त्यावेळी भोसले पोलीस यांनी लगेच गडबड करू नकोस मी तुमच्या पोलीस पाटील याच्याकडे निरोप देतो त्यावेळी येताना तु पैश्यांच्या तयारी निशी ये असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना नाईलाजाने हो म्हणुन तेथुन निघुन आलो.दिनांक 19/05/2019 रोजी आमच्या गावचे पोलीस पाटील श्री. विकास पांढरे यांनी मला माझ्या फोनवर फोन करून वाठार पोलीस स्टेशनचे भोसले पोलीस यांनी उद्या तुला वाठार पोलीस स्टेशन येथे भेट घेण्यासाठी बोलाविले आहे असा निरोप दिला. तरी मी आज रोजी मला भेटलेल्या निरोपाप्रमाणे वाठार पोलीस स्टेशन या ठिकाणी जावुन भोसले पोलीस यांची भेट घेवुन माझ्या व माझ्या भावाविरूध्द दाखल असलेल्या एन.सी. बाबत तसेच आम्ही दिलेल्या तक्रारी वरून दाखल असलेल्या एन.सी. बाबत चर्चा करून त्यांनी माझ्याकडे केलेल्या 2000/- रूपये लाच मागणी बाबत चर्चा करून चर्चेअंती ठरणारी लाच रक्कम त्यांना देणार असल्याने मी दिनांक 19/05/2019 रोजी न्टी करप्शन ब्युरो, साताराचे पोलीस उप अधिक्षक, अशोक शिर्के साहेब यांना संपर्क साधुन माझ्याकडे वाठार पोलीस स्टेशनचे भोसले पोलीस हे लाच मागणी करीत असल्याबाबत कळविले. त्यावेळी श्री. शिर्के साहेब, यांनी मला उद्या रोजी 11.00 वा. सातारा ते फलटण जाणारे रोडवरील तळीये फाटा या ठिकाणी दुचाकी वाहनासह येवुन थांबण्याची सुचना

दिली. त्यावर मी माझा भोसले पोलीस यांचे विरूध्दचा लेखी तक्रारी अर्ज लिहीला व तळीये फाटा या ठिकाणी येवुन सुचनेप्रमाणे थांबुन राहिलो. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक, अशोक शिर्के सर हे त्यांचे सापळा पथकासह तळीये फाटा या ठिकाणी मी थाबले ठिकाणी खाजगी तवेरा वाहनातुन आले. त्यावेळी शिर्के साहेबांनी मला त्यांच्या वाहनामध्ये घेवुन माझी ओळख करून घेवुन शिक्षणाधिकारी कार्यालय, (माध्यमिक), जिल्हा परिषद, सातारा कार्यालयातील दिनकर गुलाब जाधव, वरिष्ठ सहायक व राजेंद्र रघुनाथ शिंदे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी या दोन पंचांची तसेच सापळा पथकाची एकमेकांना ओळख करून दिली. त्यानंतर मी माझी तक्रार थोडक्यात शिर्के साहेबांना सांगितली व माझा लेखी तक्रारी अर्ज त्यांच्याकडे हजर केला. त्यांचे त्यांनी व दोन्ही पंचांनी वाचन करून त्यावर शिर्के साहेबांनी व दोन्ही पंचांनी सहया केल्या. तसेच माझ्या तक्रारीप्रमाणे माझ्याकडे वाठार पो.स्टे.चे पोलीस भोसले यांनी लाच मागणी केली आहे अगर कसे यांची खात्री करण्यासाठी शिर्के साहेबांनी पडताळणी करण्याचे ठरविले. त्यासाठी पंच नंबर 1 म्हणुन श्री. जाधव व पंच नंबर 2 म्हणुन श्री. शिंदे यांनी काम करण्याचे ठरवुन मला व पंच नं 1 यांना पडताळणी कामी योग्यत्या सुचना देवुन पडताळणी कामी वाठार पोलीस स्टेशन या ठिकाणी व्हाईस रेकर्डर सह माझ्या दुचाकीवरून रवाना करून पडताळणी करण्यासाठी पाठविले. मी व पंच नं 1 वाठार पोलीस स्टेशन या ठिकाणी गेलो. त्याठिकाणी पोलीस भोसले हे दिसुन आले नाहीत म्हणुन मी त्यांना फोन लावला असता त्यांनी आदर्की फाटा येथे आलो आहे असे सांगितले. काही वेळापर्यंत भोसले हे न आल्याने मी पुन्हा त्यांना फोन लावला असता त्यांनी आलोच असे सांगितले. त्यानंतर भोसले हे पोलीस वाहनातुन पोलीस स्टेशनला आले. त्यावेळी त्यांच्यामध्ये व माझ्यामध्ये माझ्या एनसी बाबत तसेच वडीलांच्या अर्जाबाबत चर्चा झाली. त्यानंतर भोसले यांनी मला एका खोलीमध्ये नेले त्या ठिकाणी त्यांनी अर्जा संदर्भाने वडीलांचा जबाब नोंदवुन त्यावर माझी सही घेतली. त्यानंतर पडताळणीमध्ये आमच्या दोघांमध्ये चर्चा होवुन माझ्यावर व माझ्या भावावर दाखल असलेल्या एन.सी मध्ये मदत करून त्यामध्ये त्रास न देण्यासाठी वाठार पोलीस स्टेशनचे भोसले पोलीस यांनी तडजोडीअंती 1500 /- रूपयांची लाच मागणी केली व ती लगेच स्विकारण्याची तयारी दर्शविल्याची पडताळणीमध्ये माझ्या व पंच नंबर 1 यांच्या हकिकतीवरून तसेच ध्वनिमुद्रीत संभाषणावरून शिर्के साहेबांची व दोन्ही पंचांची खात्री झाली. त्यानंतर शिर्के साहेबांनी दिले सुचनेप्रमाणे मी 500 रूपये दराच्या तीन नोटा असे एकुण 1500/- रूपये लाच रक्कम त्यांच्याकडे हजर केली. त्या नोटांचे नंबर त्यांनी एका को-या कागदावर लिहुन ठेवले. त्यानंतर शिर्के साहेबांनी मला व दोन्ही पंचांना त्यांच्याकडील अंथ्रासिन पावडरची डबी दाखवुन त्यांचे गुणधर्म व उपयोग समजावुन सांगितले. त्यानंतर 1500 रूपये लाच रक्कमेस अंथ्रासिन पावडर लावण्याची कारवाई खाजगी वाहनामध्ये करण्यात आली. त्यानंतर मला, दोन्ही पंचांना तसेच सापळा पथकास शिर्के साहेबांनी सापळा कारवाई संबंधाने आवश्यक त्या सर्व सुचना दिल्या. त्यानंतर माझे व पंच नंबर 1 याचे सापळा कारवाईकामी रवाना होत असल्याचे निवेदन ध्वनिमुद्रीत करून व्हाईस रेकर्डर माझ्या गळ्यामध्ये अडकवुन मला व पंच नंबर 1 यांना माझ्या दुचाकीवरून वाठार पोलीस स्टेशन या ठिकाणी रवाना केले. आमचे पाठोपाठ शिर्के साहेब, पंच नंबर 2 व पथक देखील खाजगी वाहनाने रवाना झाले.मी व पंच नं 1 असे माझ्या दुचाकीवरून वाठार पोलीस स्टेशनच्या गेटजवळ गेलो त्या ठिकाणी मी माझी गाडी पार्क केली व पोलीस स्टेशनचे आवारात ज्या ठिकाणी भोसले पोलीस उभे होते त्या ठिकाणी गेलो. त्यावेळी मला पाहताच भोसले पोलीस यांनी कुठे गेलता असे विचारले असता मी एटीएमला गेलतो एटीएम मधुन काय निघनायत म्हणुन पाहुण्यांकडुन घेवुन आलो असे सांगितले. त्यानंतर मी भोसले पोलीस यांना साहेब त्रास नाय झाला पाहिजे असे म्हणालो नंतर मी, पोलीस भोसले असे चर्चा करत करत पोलीस स्टेशनच्या पाठीमागे असलेल्या मोकळया जागेत गेलो आमच्या पाठोपाठ पंच नंबर 1 देखील आले. त्यानंतर भोसले हे पाठीमागे असलेल्या टयलेटमध्ये गेले त्यावेळी मी व पंच तेथेच थांबुन राहिलो. त्यानंतर काही वेळातच पोलीस भोसले हे परत आम्ही थांबले ठिकाणी परत आले. त्यावेळी पुन्हा माझ्यात व त्यांच्यामध्ये माझ्या एन.सी. बाबत तसेच तक्रारी अर्जाबाबत चर्चा झाली. त्यावेळी पोलीस भोसले यांनी चालतय, त्याज पण परत आल नाय, असे म्हणुन माझ्याकडे पाहुन त्यांच्या उजव्या हाताचा अंगठा तर्जनिवर घासुन लाच मागणीचा सुचक इशारा केला त्यावेळी मी माझ्या शर्टच्या छातीवरील डावे खिशात अंथ्रासिन पावडर लावुन ठेवलेली 1500/- रूपये लाच रक्कम उजव्या हाताने काढुन पोलीस भोसले यांच्या समोर धरली व बर, पंधराशे हायत, दोन म्हणलाला पंधराशेच दिल्याती, कस होतय परतनं असे म्हणालो असता भोसले पोलीस यांनी माझ्या उजव्या हातातील लाच रक्कम त्यांच्या उजव्या हाताने स्विकारून त्यांच्या पोलीस वर्दीच्या पन्टच्या पाठीमागील उजव्या खिशात ठेवली. त्यानंतर मी तेथुन काही अंतरावर बाजुला येवुन माझा डावा हात दोन वेळा डोक्यावरून फिरवुन पोलीस भोसले यांनी लाच रक्कम स्विकारले बाबतचा पुर्वनियोजित इशारा केला. त्यानंतर काही वेळातच पोलीस उप अधिक्षक, श्री. शिर्के साहेब, पंच नंबर 2 व सापळा पथक असे सर्वजण माझ्या जवळ आलात व माझ्याकडील व्हाईस रेकर्डर काढुन तो बंद केला व मला बाजुला थांबण्यास सांगुन शिर्के साहेब, पंच नंबर 2 व पथक असे सर्वजण पंच नंबर 1 जाधव ज्या ठिकाणी थांबले होते त्याच्या जवळ गेले.त्यानंतर शिर्के साहेबांनी पोलीस भोसले यांना ताब्यात घेतले. त्यानंतर त्यांना घेवुन शिर्के साहेब व पथक असे पोलीस स्टेशनमध्ये गेले. त्यावेळी मला बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर काही वेळाने मला पोलीस स्टेशनमध्ये बोलावुन घेवुन माझ्या दोन्ही पंचांसमक्ष अंधार व उजेडात अंथ्रासिन पावडरच्या तपासण्या केल्या. त्यामध्ये माझ्या उजव्या हाताचे बोटांना व पे-यांना तसेच शर्टचे छातीवरील डावे बाजुचे खिशाचे आतील भागास व कडांस अंथ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली. त्यानंतर शिर्के साहेबांनी त्यांची पुढील कारवाई करून मला माझ्या दुचाकीवरून न्टी करप्शन ब्युरो, सातारा कार्यालय या ठिकाणी येण्याच्या सुचना दिल्या. तसेच शिर्के साहेब, दोन्ही पंच, सापळा पथक असे पोलीस भोसले यांना व गार्ड यांना सोबत घेवून खाजगी वाहनाने सातारा या ठिकाणी गेले. त्यांच्या पाठोपाठ मी देखील निघालो. त्यानंतर मी माझ्या दुचाकीवरून न्टी करप्शन ब्युरो, कार्यलियाचे बाहेर पोहोचलो. त्यावेळी शिर्के साहेब हे त्या ठिकाणी पोहचले होते त्यांनी मला कार्यालयाचे बाहेरच थांबण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी थांबुन राहिलो. त्यानंतर काही वेळाने मला कार्यालयात बोलावुन घेवुन माझी कर्मचारी यांच्या करवी अंगझडती घेतली. त्यावेळी माझ्या शर्टच्या खिशात ठेवलेल्या लाच रक्कमेबाबत मला शिर्के साहेबांनी विचारले असता मी ती लाच रक्कम पोलीस भोसले यांचे मागणी प्रमाणे त्यांना वाठार येथेच दिली असल्याचे सांगितले. त्यानंतर मला पुन्हा कार्यालयाचे बाहेर थांबण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी थांबुन राहिलो. काही वेळाने पुन्हा मला कार्यालयात बोलावुन घेवुन व्हाईस रेकर्डर मधील संभाषणाबाबत विचारले असता त्यातील नामोल्लेख मी व पंच नंबर 1 यांनी सांगितला. त्यानंतर मला घडले घटनेबाबत हकिकत विचारली असता मी वरील प्रमाणे हकिकत सांगितली. तसा सविस्तर पडताळणी व सापळा पंचनामा न्टी करप्शन ब्युरो, साताराचे कार्यालयात संगणकावर टंकलिखीत करुन पुर्ण करण्यात आला आहे. तरी मोहन गुलाबराव भोसले, वय 50 वर्षे, पोलीस हवालदार, बक्कल नंबर 339, नेमणुक वाठार पोलीस स्टेशन यांनी दिनांक 20/05/2019 रोजी पडताळणी कारवाईवेळी माझ्याविरूध्द दाखल असलेल्या अदखलपात्र गुन्हयाचा तपास करून त्यामध्ये मला मदत करण्यासाठी व त्रास न देण्यासाठी तडजोडीअंती 1500/- रुपयांची लाच मागणी करून ती लाच रक्कम दिनांक 20/05/2019 रोजी 14.17 वाजण्याच्या सुमारास वाठार पोलीस स्टेशनचे पाठीमागील असले मोकळया जागेमध्ये स्वत: स्विकारली म्हणून माझी त्यांचे विरूध्द तक्रार आहे.माझा वरील खबरी जबाब माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केला असुन तो मला वाचुन दाखविला तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे. ही खबर दिली

13. **Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(**केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation: (**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):** Maruti Bhimsen Khedkar(I (Inspector)) / 1460100450MBKM7901G **or**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे **Rank (**पद**):**

**No.(**क्र.**):** **to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

**or (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**)**

(4) **Transferred to P.S.(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District (**जिल्हा**):**

**on point of jurisdiction (**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.**)**

**R.O.A.C.(**आर. ओ .ए .सी.**)**

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.(**तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**

गणेश शिवाजी शेळके

15. **Date and time of dispatch to the court (**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name (**नाम**):** Maruti Bhimsen Khedkar
**Rank(**पद**):** I (Inspector)
**No.(**सं.**):** 1460100450MBKM7901G

पोलीस स्टेशन ऑफीसर
चाकण पोलीस स्टेशन

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)